**<u>प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा उलटतपास वादीतर्फे</u>**
**<u>विधीज्ञ श्री. एल.एल.नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१७. माझी जन्मतारीख २०/०६/१९४८ अशी आहे. माझा भाऊ रामचंद्र याची जन्मतारीख मला माहीत नाही. मला माझा भाऊ मोतीराम याची जन्मतारीख माहीत नाही. माझा भाऊ रामचंद्र यास कोणता आजार आहे त्याबाबतची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. सदर कागदपत्रे मी न्यायालयात हजर केलेली नाहीत. सदर कागदपत्रे मी न्यायालयात हजर करणार आहे. प्रस्तुत प्रकरणी रामचंद्र याचा मुखत्यार म्हणून हजर केलेल्या मुखत्यारपत्राची तारीख मला माहीत आहे. मुखत्यार पत्राची तारीख २५/०५/२०१६ अशी आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दावा दाखल केल्यापासून रामचंद्र वेळोवेळी न्यायालयात तारखेस हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझा भाऊ रामचंद्र एकत्र एक–दोनदा न्यायालयात आलो होतो. मी व माझा भाऊ रामचंद्र एकत्रपणे सन २०१६ साली न्यायालयात आलो होतो. माझ्या भाऊ रामचंद्र याचे शिक्षण मॅट्रीक पर्यंत झाले आहे. माझा भाऊ रामचंद्र यास कोणता आजार आहे हे माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. तसेच, प्रस्तुत प्रकरणी हजर केलेल्या मुखत्यारपत्रामध्ये देखील माझा भाऊ रामचंद्र यास कोणता आजार आहे हे नमुद करण्यास अडचण नव्हती. माझा भाऊ रामचंद्र याच्यावर तथाकथित आजाराबाबत कोणत्या दवाखान्यात उपचार सुरु आहेत हे मला माहीत आहे. ज्या वेळेस मी मुखत्यारपत्र घेतले त्यावेळेस माझ्या भावास कोणता आजार होता हे मला माहीत होते असे म्हटल्यास बरोबर आहे. माझा भाऊ रामचंद्र त्याच्या वयाच्या २२ व्या वर्षी मुंबईस गेला. मी सन १९७० साली मुंबईस गेलो. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ रामचंद्र मुंबईस जाण्यापुर्वी गावी राहण्यास होता. कैफियतीमधील मजकुराची संपूर्ण माहिती मी माझ्या वकिलांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी कैफियत व माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र यामधील माहिती माझ्या वैयक्तीक माहितीच्या आधारावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा दाखल होण्यापुर्वी मी व माझा भाऊ रामचंद्र यांनी वादीच्या वकिलांच्या नोटीशीस उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे आहे

की, सदर उत्तर आम्ही आमचे वकील ॲड. श्री. गोरे यांच्या मार्फत दिले होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीशीच्या उत्तराची माहिती मी व माझा भाऊ रामचंद्र यांनी वकिलांना एकत्रितपणे दिली होती.

१८. माझे वडील गणपत सन १९७८ साली मयत झाले. माझी आई सन १९९९ साली मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.१ रामचंद्र यास दोन मुलगे व तीन मुली आहेत. रामचंद्र याची पत्नी हयात आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र याचे शिरगाव येथे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र बऱ्याच वेळेस शिरगाव येथील आपल्या घरी राहण्यास येतो. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र सध्या काही काम करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, शिरगाव ते देवगड हे अंतर २० कि.मी. आहे.

१९. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामधील अ.क्र.३ ची मिळकत ही शिरगाव ते साळशी या मार्गास लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकत ही देवगड – निपाणी महामार्गापासून २५० ते ३०० मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवगड तालुक्यामध्ये शिरगाव, तळेबाजार, पडेल कॅन्टीन व देवगड शहर ही चार महत्त्वाची ठिकाणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील क्र.३ येथील मिळकत मौल्यवान आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील मिळकत क्र.१ व २ यास लागून कोणताही डांबरी रस्ता नाही. दाव्यातील मिळकत क्र.१ व २ यास लागून डांबरी रस्ता असल्याबाबत कागदोपत्री पुरावा अगर नकाशा मी प्रस्तुत प्रकरणी हजर करु शकतो. ( प्रतिवादी तर्फे वकील श्री. गोरे यांनी असा आक्षेप नोंदवला की, उलटतपासामध्ये जी ॲडमिशन्स मिळवली त्याबाबत वाद कथन नसल्यास त्याबाबत साक्षीदारास कन्फ्रंट करता येणार नाही. यावर वादी तर्फे वकील श्री. नाथगोसावी यांनी असा युक्तीवाद केला की, भारतीय पुरावा कायदयामधील कलमा नुसार उलटतपास केवळ वाद कथना पुरता मर्यादित ठेवावा असे कुठेही नमुद नाही. यावर प्रतिवादी तर्फे वकील श्री. गोरे यांनी असे कथन केले की, कोणता प्रश्न उलटतपासामध्ये विचारावा याबाबत त्यांचा आक्षेप नाही. सदर आक्षेप अंतिम युक्तीवादावेळेस निश्चित करण्यात येईल. )

दाव्यातील मिळकत क्र.१ व २ ला लागून रस्ता असल्याबाबतचा नकाशा कधी मिळाला हे मला माहीत नाही. अ.क्र.२ येथे असणाऱ्या मिळकतीस लागून असणारा रस्ता देवगड – निपाणी रस्त्यापासून घरापर्यंत जातो. अ.क्र.१ येथे असणाऱ्या मिळकतीस लागून असणारा रस्ता निपाणी रोडपासून आतमध्ये जातो. अ.क्र.१ व २ ला लागून असणाऱ्या रस्त्यांना नावे दिलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता हा गावांच्या नावाने ओळखला जातो. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.१ व २ येथे असणाऱ्या मिळकती कोणत्या गावात आहेत हे मला माहीत आहे. अ.क्र.१ व २ ला लागून असणाऱ्या रस्त्याचे ग्रामपंचायत अभिलेख मी पाहिले आहेत. सदर ग्रामपंचायत अभिलेख मी हजर करु शकतो का हे पाहावे लागेल. मी अ.क्र.१ व २ येथील मिळकतींचे नकाशे पाहिले आहेत. सदर नकाशे आता माझ्या जवळ, तसेच माझा भाऊ रामचंद्र याच्याकडे उपलब्ध नाहीत.

२०. अ.क्र.३ ची मिळकत मी व माझा भाऊ रामचंद्र यांनी खरेदी घेतल्याबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, ही मिळकत सन १९७७ दरम्यान खरेदी घेतली. मिळकत खरेदी घेतल्याबाबतचा पुरावा न्यायालयात हजर केलेला नाही. सदर पुरावा न्यायालयात हजर करणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीबाबतचे खरेदी खत मोतीराम याच्या नावे आहे. नारायण विठ्ठल चव्हाण यांना रक्कम पोच केल्याबाबत आमच्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. सदर पुरावा न्यायालयात हजर केला आहे. सदर पुरावा सन १९७६ सालचा आहे. खाते नंबर ४३१ मधून रक्कम वर्ग केली होती. सदर रक्कम धनादेशाद्वारे दिली होती. सदर धनादेश किती रक्कमेचा होता हे सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीचे खरेदी खत रक्कम दोन हजार इतक्यास झाली. मी नारायण विठ्ठल चव्हाण यास रक्कम रु.८,५००/– इतक्या रकमेचा धनादेश दिला होता. माझा भाऊ रामचंद्र मुंबईस सन १९६३–६४ साली गेला. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र पोलीस खात्यात नोकरीस होता. हे म्हणणे खरे आहे की, मुंबईला गेल्यानंतर मी व रामचंद्र बऱ्याच वेळेस गावी येत असू. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७५ ते १९७८ या सालादरम्यान आम्ही बऱ्याच वेळा गावी आलो होतो.

२१. दावा मिळकतीपैकी अ.क्र.३ या मिळकतीचे हक्कसोड पत्र मी पाहिले आहे. हक्कसोड पत्र करतेवेळेस त्यातील मजकूर मी वाचून पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, हक्कसोड पत्रामध्ये अ.क्र.३ ची मिळकत ही वडिलोपार्जित आहे असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ येथील मिळकतीच्या सातबारास मोतीराम, माझे व रामचंद्र ही तीन नावे सहहिस्सेदार म्हणून नोंदली गेली. हे म्हणणे खरे आहे की, ही नावे नमुद करावीत या करिता आम्ही मोतीराम याच्याकडे पाठपुरावा केला होता. अ.क्र.३ ची मिळकत ही आम्ही तीन भाऊ म्हणजेच मोतीराम, मी स्वत: व रामचंद्र या तिघांची मिळकत आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ या मिळकतीचे मूळ हक्कसोड पत्र माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर हक्कसोडपत्रातील कथनानुसार मोतीराम याने अ.क्र.३ येथील मिळकतीचा त्याचा हक्क आमच्या लाभात सोडला आहे. प्रस्तुत प्रकरणी मूळ हक्कसोड पत्र अभिलेखावर दाखल नाही.

वादीतर्फे वकील श्री.नाथगोसावी यांनी हक्कसोडपत्राची मूळ प्रत अभिलेखावर असणे आवश्यक आहे असे कथन केले. त्याबाबत त्यांनी नि.क्र.१०७ येथे अर्ज व नि.क्र.१०८ येथे प्रतिवादीचे वकिलांना दिलेली नोटीस दाखल केली. अर्ज नि.क्र.१०७ व नोटीस नि.क्र.१०८ आदेशीत होईपर्यंत **उलटतपास तहकूब**.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

( श्रीकांत एस.पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि. ०५/०८/२०२५